**ठळक बातम्या**

- विधान परिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण पुरस्कारांचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण /विद्यार्थीनींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचं राष्ट्रपतींचं पुण्यातल्या कार्यक्रमातून शैक्षणिक संस्थांना आवाहन
- मुंबईत आयोजित २७ व्या राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स परिषदेचा प्ररंभ /ई-गव्हर्नन्स हा विकासाचा एक मूलभूत घटक असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन
- विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्रभर एसटी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरु, प्रवाशांचे हाल /उद्या बैठक घेऊन चर्चेतून मार्ग काढण्याची ग्वाही देत, संप मागं घेण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

  **आणि**

- मालवण राजकोट किल्ल्यावरचा शिवरायांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी शिल्पकार जयदीप आपटे याच्याविरोधात लूकआऊट नोटीस जारी

**<><><><><>**

महाराष्ट्र विधान परिषदेनं स्थापनेपासून आत्तापर्यंत गेल्या १०३ वर्षांमध्ये इथल्या लोकांच्या आशा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी काम केलं आणि जबाबदार वरिष्ठ सभागृहाची भूमिका बजावली आहे, असे गौरवोद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले आहेत. त्या आज महाराष्ट्र विधान परिषदेच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. या सभागृहानं वादविवाद आणि संवादाची परंपरा कायम ठेवून लोकशाही मजबूत केली, असं त्या म्हणाल्या.

राष्ट्रपतींनी आपल्या भाषणाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करून केली. विधान परिषदेच्या स्थापनेच्या इतिहासाचा उल्लेख करून, या सभागृहाची शोभा वाढवलेल्या समाजसुधारकांना त्यांनी अभिवादन केलं. याच

सभागृहाचे सभापती वि. स. पागे यांनी मांडलेली रोजगार हमी योजनेची संकल्पना पुढे मनरेगाच्या रुपानं राष्ट्रीय पातळीवर राबवली गेली, याचं स्मरणही त्यांनी केलं.

भारताची अर्धी लोकसंख्या महिलांची आहे आणि त्यांच्या प्रगतीशिवाय देशाची प्रगती होत नाही, असं राष्ट्रपतींनी सांगितलं. महाराष्ट्राच्या लेकी आणि महिला निश्चितपणे देशाचा गौरव वाढवतील, असं त्या म्हणाल्या. देशाच्या जीडीपीत पहिलं स्थान महाराष्ट्राचं असून महाराष्ट्राची विकासयात्रा अशीच वेगानं पुढे जात राहो, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

तत्पूर्वी, ‘वरिष्ठ सभागृहाची आवश्यकता आणि महत्त्व’ या विषयावरच्या ग्रंथाचं प्रकाशन राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. तसंच २०१८-१९ ते २०२३-२४ पर्यंतच्या उत्कृष्ट संसदपटू आणि उत्कृष्ट भाषण पुरस्कारांचं वितरण राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील आणि इतर यावेळी उपस्थित होते.

मालवण इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याबद्दल सर्व देशवासीयांप्रमाणेच आपल्यालाही खूप वाईट वाटलं, मात्र छत्रपतींचं स्थान सर्व देशवासीयांच्या हृदयात आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. महाराष्ट्र विधिमंडळानं मंजूर केलेले कायदे देशासाठी दिशादर्शक ठरतात, अशी ग्वाही त्यांनी दिली.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिलांच्या सबलीकरणासाठी सरकारनं आणलेल्या योजनांचा उल्लेख केला.

**<><><><><>**

राष्ट्रपतींनी आज सकाळी पुण्यात सिम्बायोसिस विद्यापीठाच्या एकविसाव्या दीक्षांत समारंभाला संबोधित केलं. शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थीनींसाठी सुरक्षित

वातावरण निर्माण करायला हवं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. देशाच्या विकासात महिलांचा अविभाज्य वाटा असल्याचं त्या यावेळी म्हणाल्या.

दीक्षांत समारंभात सुवर्णपदक विजेत्या ११ जणांमध्ये ८ विद्यार्थिनी आहेत, याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. लैंगिक समानतेवर भर देऊन सर्वसमावेशक विकासासाठी विद्यापीठ करत असलेल्या प्रयत्नांचीही त्यांनी प्रशंसा केली.

मूल्याधारित शिक्षण देणं आणि विद्यार्थ्यांना समाजाची संस्कृती आणि गरजा समजावून सांगणं हे शैक्षणिक संस्थांचं ध्येय असायला हवं, असं त्या म्हणाल्या. समाजातल्या वंचित घटकांचा विचार करून, आरोग्य सेवा उत्पादनं विकसित करण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

**<><><><><>**

ई-गव्हर्नन्स हा विकासाचा एक मूलभूत घटक असून तो सरकारला अधिक जबाबदार, सर्वसमावेशक आणि नागरिक केंद्रित बनण्यासाठी सहायक असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत आयोजित ई-गव्हर्नन्स या विषयावरच्या २७व्या राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करताना बोलत होते. 'विकसित भारत- सुरक्षित आणि शाश्वत ई-सेवा वितरण' ही या परिषदेची संकल्पना आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

ई-गव्हर्नन्स हे फक्त तंत्रज्ञान नसून लोकांची विचार प्रवृत्ती बदलण्याचं माध्यम आहे. यामधल्या पारदर्शकतेमुळे सामान्य नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास वाढत असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेच्या पहिल्या दोन हप्त्याची रक्कम अतिशय कमी वेळेत थेट लाभार्थ्यांच्या खात्यात केवळ ई गव्हर्नन्समुळे शक्य झाल्याचं त्यांनी सांगितलं.

ई गव्हर्नन्स हे सुशासनाचं मूलभूत तत्व असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाच्या संभाव्यतेवरही त्यांनी चर्चा केली. राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स पुरस्कार 2024 विजेत्यांचा उपमुख्यमंत्री फडनवीस यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन देशांच्या दौऱ्यावर असून, आज दुपारी ते ब्रुनेईची राजधानी बंदर सेरी बेगवान इथं पोहोचले. औपचारिक स्वागतानंतर, प्रधानमंत्री कार्यालयात ब्रुनेईचे युवराज हाजी अल-मुहतादी बिल्लाह यांनी त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर प्रधानमंत्री मोदी यांनी बंदर सेरी बेगवान इथं भारतीय उच्चायुक्तालयाच्या नवीन कार्यालयाचं उद्घाटन केलं. ब्रुनेई इथल्या भारतीय समुदायानं प्रधानमंत्री मोदी यांचं मोठ्या उत्साहात स्वागत केलं.

**<><><><><>**

भारताच्या समावेशक आणि शाश्वत भविष्यासाठी मजबूत आर्थिक क्षेत्राची भूमिका महत्वाची असल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर डॉ. मिशेल पात्रा यांनी म्हटलं आहे. ते आज भारतीय उद्योग महासंघानं मुंबईत आयोजित केलेल्या परिषदेला संबोधित करत होते. अर्थकारण आणि विकासामधला परस्पर संबंध लक्षात घेता, भारताचं भविष्य घडवण्यात आणि त्याला आकार देण्यात आर्थिक

क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व असल्याचं ते यावेळी म्हणाले.

डॉ. पात्रा यांनी पायाभूत सुविधांचा अर्थपुरवठा, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग, कौशल्य विकास, हवामान बदल आणि डिजिटायझेशन यासह पाच विशिष्ट क्षेत्रांची रूपरेषा स्पष्ट केली, आणि ते म्हणाले की, या क्षेत्रांमध्ये एक प्रमुख शक्ती म्हणून भारताच्या उद्यासाठी  अर्थ क्षेत्र महत्वाची भूमिका बजावेल.

**<><><><><>**

एसटी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी बेमुदत संप पुकारला आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच सेवा सुविधा मिळाव्यात, घरभाडे भत्ता, महागाई भत्ता, तसंच इतर सुविधाही राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच असाव्यात ही त्यांची प्रमुख मागणी आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या संयुक्त कृती समितीनं राज्य सरकारला निवेदन देऊन सुद्धा त्यावर काहीही कार्यवाही झाली नाही, राज्य सरकार विविध लोकोपयोगी योजनांची घोषणा करत असतांना आमच्या मागण्या आणि वेतन वाढीकडेही सरकार सातत्यानं दुर्लक्ष करत आहे, या संदर्भात एक महिन्यापूर्वी नोटीस देऊनही सरकारनं दखल घेतली नाही, त्यामुळे हा बेमुदत संप सुरु केला असल्याचं कर्मचाऱ्यांनी सांगितलं.

एसटी कामगारांच्या सर्व संघटना यात सहभागी झाल्या आहेत. त्यामुळे बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून येत आहे. मात्र यामुळे प्रवाशांचे हाल होत असल्याचं आमच्या ठीकठिकाणच्या वार्ताहरांनी कळवलं आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत उद्या बैठक घेऊन चर्चेतून मार्ग काढू, कर्मचाऱ्यांनी संप करु नये, असं आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे.

सरकार आणि कर्मचारी संघटनांमधली बैठक निष्फळ ठरली. गणेशोत्सवाच्या काळात संप करु नका, असं आवाहन उदय सामंत यांनी केलं.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या मालवण राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याप्रकरणी शिल्पकार जयदीप आपटे याच्याविरोधात पोलिसांनी लूकआऊट नोटीस जारी केली आहे. जयदीप याच्यावर पुतळ्याच्या बांधकामात हलगर्जीपणा केल्याचा आरोप आहे. पुतळा कोसळल्याच्या दिवसापासून जयदीप फरार आहे. या प्रकरणातला दुसरा आरोपी चेतन पाटील याला यापूर्वीच अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

देशाची संरक्षण सज्जता वाढवण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारनं एक लाख ४५ हजार कोटी रुपयांच्या विविध प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली संरक्षण खरेदी परिषदेची बैठक झाली. या बैठकीत १० भांडवली अधिग्रहण प्रस्तावांना मंजुरी दिली गेली. या सोबतच या बैठकीत भविष्यवेधी लढाऊ वाहनं, हवाई संरक्षणविषयक प्रक्षेपक नियंत्रक रडार, डॉर्नियर-२२८ विमाने तसंच गस्तीच्या अत्याधुनिक जहाजांच्या खरेदीलाही मंजुरी दिली गेली.

**<><><><><>**

पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेत गेल्या काही दिवसांच्या चमकदार कामगिरीनंतर आज सहाव्या दिवशी भारत पदकाच्या प्रतिक्षेत आहे. महिलांच्या गोळाफेक एफ ३४ च्या अंतिम फेरीत भाग्यश्री जाधव पाचव्या स्थानावर रा◌ाहिली. महिलांच्या रिकर्व्ह स्पर्धेत तिरंदाज पूजा ने ६-० ने विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. नेमबाज अवनी लेखरा ५० मीटर रायफल ३ पोझिशन एसएच एक प्रकारात अंतिम फेरीत पोहचली आहे, आज सायंकाळी साडे सात वाजता तिचा सुवर्णपदकासाठी सामना होणार आहे.

पुरुषांच्या उंच उडी स्पर्धेत टी त्रेसष्ट प्रकाराच्या अंतिम फेरीत मरियप्पन थांगावेलू, शैलेशकुमार आणि शरद कुमार हे पदकांसाठी आज मैदानात उतरतील.

महिलांच्या ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत टी २० प्रकारच्या अंतिम फेरीत सहभागी होणार आहे. तर अजित सिंग, रिंकू आणि सुंदर सिंग हे खेळाडू पुरुषांच्या भालाफेक एफ ४६ प्रकारात अंतिम फेरीत पदकासाठी लढत देतील.

<><><><><>

अमेरीकन खुल्या टेनिस स्पर्धेत रोहन बोपण्णा आणि त्याची इंडोनेशियन जोडीदार अल्डिला सुतजियादी यांनी मिश्र दुहेरीच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी उपांत्यपूर्व फेरीत मॅथ्यू एब्डेन आणि बार्बोरा क्रेजिकोव्हा या जोडीवर ७-६, २-६, १०-७ असा विजय मिळवला. उपांत्य फेरीत त्यांचा सामना डोनाल्ड यंग आणि टेलर टाऊनसेंड या अमेरिकन जोडीशी होणार आहे.

<><><><><>

राज्याच्या विविध भागांत पावसाचा जोर कायम असून, नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत. नांदेड जिल्ह्यातल्या भोकर तालुक्यात रेणापूर इथं आज दुपारी सुधा नदीत पोहण्यासाठी गेलेले दोन तरुण वाहून गेले. स्थानिक प्रशासन त्यांचा शोध घेत आहे.

**परभणी** जिल्ह्यात आज सकाळपासून पावसानं विश्रांती घेतली. दमदार पावसामुळे जिल्ह्यातल्या येलदरी, दुधना, ढालेगाव तारुगव्हाण आणि मासोळी या धरणांच्या पाणी साठ्यात चांगली भर पडली आहे. धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु झाल्यामुळे गोदावरी , पूर्णा, दुधना, करपरा या नद्यांना पूर आला आहे. झिरोफाटा - पूर्णा, पूर्णा-पालम या मार्गांवर पुराचं पाणी पुलावर आल्यामुळे आजही वाहतूक बंद आहे. जिंतूर तालुक्यात करपरा नदीला पूर आला असून, सेलु तालुक्यातल्या बोथ, ब्रम्हवाकडी, रोहिना काजळे, रावा या गावांचा आज सकाळ पर्यंत संपर्क तुटला होता.

**जालना** जिल्ह्यात काही ठिकाणी दमदार पाऊस पडत असून, जालना शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या घाणेवाडी इथल्या संत गाडगेबाबा जलाशयाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे.

**बुलडाणा** जिल्ह्यात गेले दोन दिवस मुसळधार पाऊस पडत असून, नदी नाले दुथडी भरून वाहत आहेत. वैनगंगा नदीला पूर आला असून जिल्ह्यातले सर्वच प्रकल्प जवळजवळ शंभर टक्के भरले आहेत.

**खडकपूर्णा** धरणाचे सर्व १९ दरवाजे उघडले असून, जिल्हा प्रशासनानं नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

<><><><><>

पूर्व विदर्भ आणि लगतच्या तेलंगणावरचा तीव्र कमी दाबाचा पट्टा पश्चिमेकडे सरकला आहे. येत्या दोन दिवसांत कोकणात आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. या काळात कोकणात आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.